आजचा सुविचार
काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थांचे
आयुष्य उजलवत असतो...

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २३४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०६ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## 'महाराष्ट्राच्या राजकारणात आठ दिवसांत मोठा भूकंप होणार' : नाना पटोले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नागपूर :** भाजपचा आजवरचा इतिहास पाहिला तर त्यांनी नेहमीच आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचे काम केले आहे. आताही भाजप आपल्यास मित्रपक्षांवर डाव टाकत असून आगामी आठ दिवसात राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप बघायला मिळेल, असा मोठा दावा काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला आहे. नाना पटोले रविवारी (५ एप्रिल) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी पाज राज्यांच्या निवडणूक निकालांपूर्वीच 'ऑपरेशन लोटस' पूर्णत्वास जाणार असल्याचा दावा केला आहे.

अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि शिवसेना उद्धव ठाकरे ठाकरे, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक बडे नेते, आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा केला होता. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर नाना पटोले यांनी मित्र पक्षांना संपवणे हा भाजपचा इतिहासच असल्याचे सांगितले. भाजप हा इतरांना गिळंकृत करणार पक्ष आहे. देशभरातील भाजपच्या मित्र पक्षांचे काय झाले यावर नजर टाकल्यास शिंदे सेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फार काही भवितव्य दिसत नाही. त्यांचे नेते भाजपमध्ये साम ील झाल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. याची सुरुवात झाली आहे. असे झाल्यास राज्यात यापुढे भाजप आणि काँग्रेस हे दोनच पक्ष शिल्लक राहतील, असे नाना पटोले म्हणाले.

**मोठा खेळ शिल्लक असल्याचा पटोलेंचा दावा...**



भाजप हा अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा गेम करणार असल्याचे मी आधीच बोललो होतो. आणखी मोठा खेळ शिल्लक आहे. फक्त आठ दिवस थांबा हे तुम्हाला दिसेल. महाराष्ट्राची जनता भाजपच्या या खेळाला कंटाळली आहे. त्यांना पुन्हा सत्तेवर काँग्रेस हवी आहे. मात्र सरकारने बॅलेटवर मतदान घेतले तर जनता भाजपला त्यांची जागा दाखवून देली, असा दावाही नाना पटोले यांनी केला.

**अशोक खरात प्रकरणावरुन सरकारवर टीका...**

यावेळी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर विचारले असता नाना पटोले म्हणाले, अशोक खरात हा सत्ताधाऱ्यांनीच पोसलेला बाब असून त्याच्या आश्रमात बड्या नेत्यांची आणि अति महत्वाच्या व्यक्तींची ये-जा होती. यानंतर सरकार आणि गृहमंत्र्यांना त्याची माहिती नाही हे पटण्यासारखे नाही. सरकानेच त्याला पाठीशी घालते. आता हे प्रकरण अंगलट असल्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

## ठाणे जिल्ह्यात तब्बल २७ खाजगी शाळा अनधिकृत

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.०५, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील शहरी भागासह ग्रामीण भागातही दिवसेंदिवस अनधिकृत शाळांचे पेव फुटल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. जिल्ह्यातील एकूण १५ शाळांना कायमचे टाळे ठोकण्यात आले असून ३ शाळांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान या सर्व शाळांकडून राज्य शिक्षण मंडळ, CBSE, ICSE, IB बोर्डांच्या नावाखाली आकर्षक जाहिराती केल्या जात असून पालकांची दिशाभूल होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळा शासनमान्य आहे की नाही याची खात्री करूनच प्रवेश घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद ठाणेच्या शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील २७ अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश घेतल्यास व त्यातून शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पालकांची राहील, याची नोंद घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. तसेच, जिल्हा परिषद ठाणेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून पालकांनी अशा शाळां मध्ये कोणत्याही परिस्थितीत प्रवेश घेवू नये असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान पालकांनी आपल्या पाल्याचा शाळेत प्रवेश घेताना संबंधित शाळा शासनमान्य आहे की नाही, याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे. अनधिकृत शाळांकडून आकर्षक जाहिराती करून पालकांची फसवणूक केली जात आहे. अशा शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे पालकांनी जागरूक राहून केवळ मान्यताप्राप्त शाळांमध्येच प्रवेश घ्यावा. जिल्हा परिषद ठाणेच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत शाळांविरुद्ध कठोर कारवाई सुरू असून अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी स्पष्ट केले.

## बल्लारपूर मध्यरात्री सशस्त्र हल्ल्याने हादरले !

### युवकावर शस्त्राने गंभीर हल्ला, आरोपी फरार...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५. बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर शहरातील मौलाना आझाद वार्ड परिसरात रविवारी मध्यरात्री घडलेल्या प्राणघातक हल्ल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जुन्या वैमनस्यातून काही आरोपींनी एका युवकावर खंजर, चाकू व जांभीया यांसारख्या धारदार शस्त्रांनी सपासप वार करत त्याला जीवघेणा मारहाण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात निरंजन यादव हा युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अंकित रामटेके व जखमी निरंजन यादव हे दोघे मित्र असून




ते नेहमीप्रमाणे घरासमोरील निंबाच्या झाडाजवळील ओट्यावर बसले होते. दरम्यान, ५ एप्रिल रोजी रात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास आरोपी शाहरुख शेरखान पठाण, सोहेल खान, भोकण्या भुऱ्या रा. रवींद्र नगर, बल्लारपूर तसेच बाबू आणि एक अनोळखी तरुण मोटारसायकलवरून घटनास्थळी आले.

आरोपींनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून निरंजन यादव याला उघडपणे जीवे मारण्याची धमकी देत त्याच्यावर धारदार शस्त्रांनी अमानुष हल्ला चढवला. डोक्यावर व शरीरावर झालेल्या गंभीर वारांमुळे तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. हल्ल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून पोलिसांनी त्यांच्या शोधासाठी विशेष पथके तैनात केली आहेत. शहरात नाकाबंदी करून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी बल्लारपूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), १२६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून पोलीस आरोपींच्या अटकेसाठी जोरदार हालचाली सुरू आहेत.

## घोडा ई रिक्षा वादामुळे, माथेरानच्या विकासकांमाना ब्रेक

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**



**दि.०५, माथेरान :** माथेरान नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला मिळालेल्या भरघोस यशानंतर शहराच्या विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांसह नवनिर्वाचित प्रतिनिधींनी व्यक्त केली होती. मात्र, सध्या घोडा व ई-रिक्षा संघटनांमधील वादामुळे प्रशासनाचा मोठा वेळ याच प्रश्नात खर्च होत असून, विकासकामे रखडल्याची खंत नगरसेविकांनी व्यक्त केली आहे. आमदार महेद्र थोरवे यांनी माथेरान नगरसेवक नगरसेविका प्रमुख कार्यकर्त्यांची कर्जत येथे बैठक घेतली त्या वेळी नगरसेविका रिजवाना शेख, ऐश्वर्या शिंदे, लता ढेबे, सुरेखा साळुंखे, कमल गायकवाड, अर्चना भिलारे तसेच महिला आघाडीच्या प्रमुख संगीता जांभळे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे आपल्या समस्या मांडल्या,प्रभागातील रस्ते व इतर महत्त्वाची कामे प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार क्ले ब्लॉक्सच्या रस्त्यांचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. विशेषतः महात्मा गांधी रस्त्यापासून शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, कस्तुरबा रोडवरील निकृष्ट कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, नागरिक जखमी होण्याच्या घटना वाढल्या आहेत. याच मार्गावरून ई-रिक्षांचीही वाहतूक होत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.नगरपालिका तुटलेले ब्लॉक्स बदलण्याचे काम करत असताना काही घोडेधारकांकडून अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप नगरसेविकांनी केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात दुरुस्ती न करण्याबाबत कोणतीही अट नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

२०१४ मध्ये मातीची धूप रोखण्यासाठी व धूळमुक्त रस्ते करण्यासाठी क्ले ब्लॉक्स बसवण्याचा निर्णय घेतला गेला होता, तेव्हा कोणताही विरोध झाला नव्हता. मात्र, २०२२ मध्ये ई-रिक्षांना परवानगी मिळाल्यानंतर हा वाद तीव्र झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, आमदार महेंद्र थोरवे यांनी लवकरच माथेरानला भेट देऊन हा तिढा सोडवण्याचे आश्वासन दिले आहे.

## राहुरीत काँग्रेसचाच उमेदवार देणार बाळासाहेब थोरात

### पोटनिवडणूक महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविण्यात येणार !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, अहिल्यानगर :** राहुरी - अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविण्यात येणार आहे. येथे काँग्रेसकडूनच उमेदवार दिला जाईल, अशी स्पष्टोक्ती माजी महसूलमंत्री व काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

अहिल्यानगर येथे पत्रकारांशी बोलताना थोरात म्हणाले, की राहुरी - अहिल्यानगर येथे उमेदवार देऊन तो जिंकून येण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. माजी मंत्री व राहुरीचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे येथुन निवडणूक लढवण्यासंदर्भात काय सुरू आहे,याची मला कल्पना नाही,ते माझ्या संपर्कात नाहीत. त्यामुळे योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ. मात्र ही निवडणूक जिंकणे, हे ध्येय आहे.

दरम्यान, अहिल्यानगर येथे शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गटाचे) नेते रावसाहेब खेवरे व थोरात यांची बैठक झाली. या बैठकीत काय चर्चा झाली, हे मात्र समजू शकले नाही. थोरात यांनीही शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व काँग्रेस यांच्यातील आघाडीसंदर्भात मतप्रदर्शन करण्याचे टाळले.



**मविआमधून निर्णय घ्यावा..**

राहुरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची ताकद आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा ही महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडे आहे. परंतु त्यांचे पूर्वीचे उमेदवार माजी आमदार मंत्री प्राजक्त तनपुरे हे हिंदुत्वाच्या मुद्द्यावर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तनपुरे यांच्या उमेदवारीबाबत शरद पवार यांच्या पक्षाकडून चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. पण निर्णय अजून काही बाहेर आलेला नाही. त्या ठिकाणी महाविकास आघाडीचे तिन्ही घटक पक्षांना एकत्र बसून निर्णय घ्यावा लागेल.

**– संजय राऊत, खासदार**

**संगमनेरची निवडणूक गांभीर्याने घ्यायची होती**

येथील पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार देणार असल्याच्या वृत्ताच्या अनुषंगाने जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बाळासाहेब थोरात यांच्यावर टीका केली. येथे भाजपाचा उमेदवार निश्चित निवडून येणार आहे. थोरात यांनी यापेक्षा संगमनेरची निवडणूक गांभीर्याने घ्यायला हवी होती, अशा शब्दांत विखे पाटील यांनी टीका केली.

## शिक्षकांची या वर्षीची उन्हाळी सुट्टी रद्द

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, मुंबई :** राज्यातील शाळांना २ मे ते १४ जूनदरम्यान उन्हाळ्याच्या सुट्ट्या जाहीर झाल्या असल्या, तरी शिक्षकांना या काळात विश्रांती मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद, महापालिका तसेच खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांना १६ मे ते १४ जून या कालावधीत जनगणनेचे काम देण्यात आले आहे. त्यामुळे उन्हाळी सुट्ट्यांचे नियोजन केलेल्या अनेक शिक्षकांचे नियोजन विस्कळीत झाले असून, शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी विश्रांतीचा असला, तरी शिक्षकांना मात्र या काळात जनगणनेची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. प्रशासनाने शिक्षकांना मुख्यालय न सोडण्याच्या सूचना दिल्या असल्याने त्यांना या कालावधीत आपल्या कार्यक्षेत्रातच राहावे लागणार आहे.

जनगणना मोहिमेसाठी शिक्षकांना १६ मेपासून घराघरांत जाऊन माहिती संकलन करण्याचे काम सोपविण्यात आले आहे. यासाठी त्यांना संबंधित कुटुंबांची माहिती नोंदवून ती प्रशासनाकडे सादर करावी लागणार आहे. ही प्रक्रिया १४ जूनपर्यंत चालणार आहे.

## पुण्यातील कॉलेज जवळील लॉजवर पोलिसांचा छापा

**दि.०५, पुणे :** पुण्यातील शांत समजल्या जाणाऱ्या नऱ्हे गाव परिसरात एक धक्कादायक वास्तव समोर आलं, जे बाहेरून 'स्वर्ग' नावाने ओळखल्या जाणाऱ्या लॉजच्या आड सुरू होतं. झील कॉलेजजवळील स्वर्ग एक्झिक्युटिव्ह पॅराडाईज लॉजमध्ये सुरू असलेल्या सेक्स रॅकेटवर गुन्हे शाखेने टाकलेल्या छाप्याने या भागात खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला काही दिवसांपासून या लॉजबाबत संशयास्पद हालचालींची माहिती मिळत होती. या ठिकाणी महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी अत्यंत शिताफीने कारवाईची योजना आखली.

पोलिसांनी प्रथम बनावट ग्राहक पाठवून माहितीची खात्री केली. व्यवहार निश्चित झाल्यानंतर सिग्नल मिळताच पथकाने अचानक लॉजवर धाड टाकली. या वेळी आत सुरू असलेला घाणेरडा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी तत्काळ चार महिलांची सुटका करत त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. या प्रकरणात तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. अभिषेक दिलीप गवळी (रा. खेड शिवापूर), रामू सांडू देवकर (रा. सिंहगडरोड) आणि महेश गणेश नागने (रा. न-हे गाव) अशी त्यांची नावे आहेत. प्राथमिक तपासात हे तिघेही या रॅकेटशी थेट संबंधित असल्याचे समोर आले आहे.




## बांधावरती मिटवा वाद...

भारतातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्येला उपजीविकेचे साधन शेती पुरविते. मराठवाड्यातील तर सर्वच जिल्हे शेतीप्रधान. एके काळी एकेका कुटुंबाकडे मोठ्या प्रमाणात शेती असायची. तेव्हा एकत्र कुटुंबपद्धती होती. आता सगळीकडे मोठे बदल झाले. मोठ्या शेतीत वाटे झाले, क्षेत्र कमी झाल्यामुळे उत्पन्नातही घट आली.

शेतातील बांध, सामायिक विहिरीवरून पाणी घेणे, पायवाट, पाणंद रस्ते, वहिवाटीचा रस्ता आदी कारणांवरून शेतीशी निगडित छोटे-मोठे वाद होत असतात. काही वेळा अगदी किरकोळ स्वरूपाचा हा प्रश्न असतो. पण कुठे भाऊबंदकी, कुठे अहं, कुठे राजकारण अशा विविध कारणांनी हे वाद वर्षानुवर्षे सुरू राहतात. त्यातून कुणाचा फायदा होत नाहीच; पण नुकसान मात्र निश्चित होते. शेतीतील किरकोळ वाद मिटावेत, शेताच्या दोन शेजाऱ्यांमधील परस्परसंबंध चांगले व्हावेत, या उद्देशाने लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर' हा अभिनव उपक्रम सुरू केला. हा उपक्रम राज्यासाठी निश्चित आदर्श ठरणार आहे.

तांबे लातुरात रुजू होऊन दहा महिन्यांचा कालावधी लोटला. लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपाययोजनांचे नियोजन करताना जिल्ह्यातील गुन्ह्यांचे विश्लेषण त्यांनी केले. लातूर जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात आलेल्या अर्जांपैकी बहुतांश अर्ज हे शेतीशी निगडित वादाचे आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. शेती बांधाचे वाद, पाण्यावरून वाद, रस्त्यावरून वाद असे त्यांचे स्वरूप होते. त्यात मूळ मालकी, हद्द, बांधावरून दावे प्रतिदावे, शेतरस्ता, वहिवाट आणि पाण्याचा वाद अशी पाच प्रमुख प्रकारांची वर्गवारी त्यांनी केली. याबाबतच्या वादांची प्रकरणे पोलिसांपर्यंत पोचतात. पोलिसांकडे आलेल्या तक्रारी खऱ्या की खोट्या? सांगणाऱ्यांपैकी नेमके कुणाचे खरे? असे प्रश्न उपस्थित होत होते. शेतीविषयक वाद मिटविण्यासाठी या सर्व मुद्यांचा अभ्यास करून अम ोल तांबे यांनी एक कार्यक्रम हाती घेतला 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर'. या कार्यक्रमाच्या अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांतर्गत कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला. ज्या गावातून शेतीच्या वादाची तक्रार आली आहे तिथे संबंधित पोलिस ठाण्याचे ठाणेदार, तलाठी आणि पोलिस पाटील यांना थेट बांधावर पाठविणे सुरू केले. शेती मोजणीपासून रस्ता, पाणी असा कुठलाही वाद असेल तिथे सर्वांसमक्ष मोजणी करून तक्रारदार, ज्याच्याविरुद्ध तक्रार केली आहे तो पक्ष, सरपंच वा गावातील महत्त्वाची मंडळी एकत्र येऊन जागेवरच तंटा मिटविण्यासाठी पुढाकार घेणे सुरू झाले. पोलिस अधिकारी, कर्मचारी वाद सोडविण्यासाठी आले आहेत हे पाहून गावकरी, तक्रारदार आणि अन्य मंडळीही सहकार्यासाठी पुढे आली. त्यांच्या मध्यस्थीचा अनेक ठिकाणी तत्काळ सकारात्मक फायदा झाला.

मागच्या तीन आठवड्यांत शेतीविषयक किरकोळ स्वरूपाचे अनेक वाद पोलिसांनी बांधावरच मिटवले. आपसातील वाद, किरकोळ इगो पोलिसांच्या पुढाकाराने मिटत असल्याचे यातून दिसते आहे. लातूर जिल्ह्यातील अशा प्रकरणांची माहिती घेऊन अडीच महिन्यांची योजना आखण्यात आली आहे. हा उपक्रम ३०मेपर्यंत राबविला जाणार आहे. पहिल्या तीन आठवड्यातील यश पाहता लातूर जिल्ह्याचा हा पथदर्शी प्रकल्प राज्यात फायदेशीर ठरणार आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे, शेतीचे वाद मिटवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना गावातील अन्य अडचणीदेखील लगेच कळून येत आहेत. त्यातून गैरप्रकारांना आळा घालता जात आहे. लोकांचा पोलिस प्रशासनावर विश्वास वाढत आहे. हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्यानंतर पुढे ग्रामसुरक्षा दल बनविण्याचा तांबे यांच्या विचाराधीन आहे. 'पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर' उपक्रम राज्यभर राबविला तर पोलिस प्रशासनाचा हा नवा 'लातूर पॅटर्न' राज्यासाठी उपयुक्त ठरेल. शेतीविषयक तंटे सोडविण्यासाठी प्रशासनाला लागणारा वेळ, श्रम व आर्थिक बचतही होईल. त्यामुळे याचा राज्यव्यापी विचार व्हायला हवा.

**- मकरंद कुलकर्णी**

# फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका



सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. काही वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफ ुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफ ुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.


**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# संत गजानन स्वामींचे शिष्यरत्न ; संत भास्कर महाराज

परिसाच्या स्पर्शाने लोहाला सुवर्णत्व प्राप्त होते. त्याचप्रमाणे संतरजचरणाच्या स्पर्शाने भूक्षेत्र पावन होत असते. महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील,संत चुडामणी गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र आणि चैतन्याने बहरलेली, पुण्यभूमी म्हणून 'भास्कर नगरी'ची ओळख आहे. श्रीक्षेत्र शेगावापासून पन्नास किलोमीटर,तर अकोटपासून बारा किलोमीटर अंतरावर आडगाव (बु) नजीक द्वारकेश्वर मंदिराजवळ,निसर्गरम्य तपोभूमी ही भास्कर नगरी म्हणून श्रींच्या भक्तगणात परिचित झाली.ती श्री गजानन महाराजांचे पट्टशिष्य भास्कर महाराजांच्या समाधीस्थळामुळे.

श्री भास्कर महाराजांच्या चरित्रांमृतावरून असे मानले जाते की, त्यांचा जन्म इ.स. १८०० मध्ये गीता जयंतीच्या पर्वावर झाला. पार्वती व कर्ताजी पाटील जायले असे त्यांच्या मातापित्यांचे नाव होते. कर्ताजी हे नागपूरच्या प्रसिद्ध भोसले घराण्यातील रघुजीराजे भोसले (द्वितीय) यांचे सरदार होते.रघुजी राजांनी अकोट-अंजनगाव मार्गावर असलेल्या अकोली या गावची जहागिरी त्यांना दिली होती.वंशपरंपरेने त्यांचे कुटुंबीय नित्यनेमाने देहू,आळंदी,पंढरपूर वारी करीत असत.भास्कर म हाराजांच्या जन्मानंतर तीन वर्षांनी इंग्रज मराठ्यात भीषण युद्ध झाले. त्यात कर्ताजी पाटील वीरगती प्राप्त झाले. कर्ताजींच्या पश्चात पार्वतीने पार्वतीबाईंनी लहानग्या भास्करांना वाढविले.युद्धकलेचे शिक्षण दिले व पुढे गजानन स्वामींचे शिष्यत्व स्वीकारले. शिष्यत्वाच्या प्रवासाबाबत शीगजानन विजयग्रंथाच्या अकराव्या अध्यायात ग्रंथकारांनी ठळकपणे उल्लेख केलेला दिसतो.

एके दिवशी वैशाख मासाच्या ग्रीष्मपर्वावर प्रखर उन्हात योगी गजानन स्वामी अनवाणी पायाने आडगावी जाण्यास निघाले. वाटेत त्यांना तहान लागली. आडगावात दूरपर्यंत कुठेही पाणी दिसत नव्हते.अकोली गावच्या शिवारातील एका शेतात, एक शेतकरी पाणी घालत असल्याचे त्यांना दिसले, तेच भास्कर पाटील होते. त्यांच्याकडून गजानन स्वाम ींनी पिण्याच्या पाण्याची मागणी केली. भास्करांनी एका घागरीत पाणी आणले,परंतु दिगंबरावस्थेत महाराजांना बघून पाणी देण्याचे नाकारले. म्हणाले की, वृथा तिकडे कशाला जातोय! ती विहीर कोरडी ठणठणीत आहे. बारा वर्षांपासून कोरड्या पडलेल्या विहिरी समोर गजानन स्वामी आले आणि भगवंतांना प्रार्थना करू लागले. हे भगवंता, तुझ्या भक्तांना पाणी दे रे.! प्रार्थनेच्या अंती कोरड्या पडलेल्या विहिरीला झरा फुटण्यास प्रारंभ झाला. हे पाहून भास्कर पाटील दिगंबरावस्थेतील गृहस्थ योगी असल्याची खात्री पटली.गजानन स्वामींना क्षमायाचना ते करू लागलेत. पुढे भास्कर पाटलांनी गजानन स्वामींचे शिष्यत्व स्वीकारले व शेगावात गेले. भास्करांनी जवळपास तीन दशके शेगावात वास्तव्य करून गजानन स्वाम ींची सेवा केली.या सेवाकाळात गजानन महाराजांनी भास्कर महाराजांची वेळोवेळी परीक्षाही घेतली.एके वेळेस दासनवमीच्या उत्सवासाठी बाळापुरात गेले असताना,भास्कर महाराजांना पिसाळलेल्या कुत्र्यांचा दंश झाला होता. प्रसंगी गजानन स्वामींनी त्यांच्या




शरीरातील श्वानदंशाचे विष उतरविले. मात्र,दोनच महिन्यांचे तुझे आयुष्य उरले आहे,असे ते भास्करांना म्हणाले.जन्म मृत्यू हे अंतिम सत्य आहे, जे जे तुझ्या बाबत घडले आहे.ते प्रारब्ध, संचित आणि क्रियामानावर अवलंबून आहे. मोह त्यागून प्रारब्धाचे भोग भोगण्यास तत्पर राहावे. असे म्हणून भास्कर महाराजांचे सांत्वन केले. त्यानंतर गजानन महाराजांनी त्यांना शिवरात्रीच्या पर्वावर त्र्यंबकेश्वर तीर्थाचे दर्शन घडविले. १९०७ मध्ये हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी गजानन स्वामी बाळाभाऊ व पितांबर या काही शिष्यांच्या समावेत अकोट वरून प्राचीन व्दारकेश्वर महादेव मंदिराच्या ठिकाणी आले.

चैत्र कृष्ण पंचमी तिथीला भास्कर म हाराजांच्या देहाचे विसर्जन होणार,असे उपस्थित शेकडो हरिभक्तांना सांगितले.

पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, हरि नारायण नारायण

अशा गजरात माळबुका,पुष्पमाळा पद्मासनात ध्यानस्थ बसून माध्यानाच्या समयास भास्कर म हाराजांनी देहत्याग केला.या देहात्यागाच्या प्रसंगी स्वतः गजानन महाराज उपस्थित होते.असा उल्लेख विजय ग्रंथामध्ये आहे.

**जागा द्वारकेश्वराचीश्र परमरमणीय होती साची**
**झाडे चिंच वृक्षांची श्र होती विशेष ठाया**
निंब अश्वस्थ मांदार ।
आम्र वट औदुंबर ऐसी वृक्ष होते इतर
शिवाय काही फुलझाडेही
आडगाव अकोली च्या मध्यंतरी हे ठिकाण निर्वाणीचे
तेथे समाधी दिधली खरी समर्थांनी
भास्कराला १३०

या समाधी सोहळ्यानंतरही स्वतः चौदा दिवस गजानन महाराज तिथेच वास्तव्यास राहिले.या सोहळ्याचा एक भाग म्हणून गजानन महाराजांच्या सूचनेनुसार, भास्कर महाराजांच्या स्मरणार्थ दहा दिवस अन्नदान झाल्याचाही उल्लेख विजय ग्रंथामध्ये आढळून येतो. या अन्नदानाच्या वेळेस व्दारकेश्वरात मोठ्या संख्येने जमलेल्या भक्तांना कावळ्यांचा त्रास होऊ लागला. काही लोक या कावळ्यांना मारण्यासाठी धावलेत. मात्र गजानन महाराजांनी कावळ्यांना ठार मारण्यापासून रोखले आणि कावळ्यांना स्वहस्ते संत भंडाऱ्याचा प्रसाद देत या परिसरात बारा वर्षे न येण्याची आज्ञा केली. त्यानंतर कावळे तिथून निघून गेलेत.तेव्हापासून या परिसरात कावळे फिरकत नसल्याची आख्यायिका सांगितल्या जाते.पशुपक्षी सुद्धा संतांची आज्ञा पाळतात,हे या उदाहरणावरून लक्षात आल्याशिवाय राहत नाही. संतांच्या संगतीत परमानंद असून;जीवनाला परमोच्च गती प्राप्त होते. हे भास्कर महाराजांच्या चरित्राकडे बघून कळते. आपल्या मनाप्रमाणे वाटेल तसे वागल्यास,आपली अधोगती होऊ शकते. यासाठी संतांची संगती धरली पाहिजे,असा आग्रह संत ज्ञानदेवांनी केला आहे.

संतांचे संगती मनोमार्गे गती आकळावा श्रीपती येणे पंथे हाच खरा संत चरित्रातून मानवास बोध ठरतो.

**- शशिकांत म.तोटे**
**दारव्हा,जि.यवतमाळ**
**मो:९१३०८३५४५८**

## बीज व्यवसाय

स्त्री बिजांची तस्करी
विचित्र क्रुर व्यवसाय
खेडोपाड्यातशहरांत
असूर पसरतोयं पाय

गरीब स्त्रिया जाळ्यां
फसून जाय असहाय
पांढ-यावेशात राक्षस
कशी ना लागती हाय

वंध्यत्व बनलायं शाप
कसेही बनवा हो माय
कसायांच्यादावणीला
का बांधून घेते रे गाय

आकर्षकजाहिरातीत
आयव्ही एफचे उपाय
महाग उपचार पध्दती
सोसायचे सारे अपाय

कौन्सिलिंग प्रेझेंटेशन
सुचवा खर्चिक पर्याय
पटवूनदेती सहजपणे
तू गं माय होणारं नाय

कर्ज काढू होकार देई
सुशिक्षिताचानिरुपाय
सुलभहप्त्याचेआमीष
घामाचीकमाई सफाय

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... आपली

# महिलांना सर्वच क्षेत्रात संधी... पण प्रत्यक्षात कामाची संधी काही ठिकाणी कमी

अलीकडे मुंबई महानगर पालिकेत महिला राज आल्याची बातमी वाचली. मुंबई शहराच्या गेल्या दीडशे वर्षाच्या काळात प्रथमच शहराच्या आयुक्त म्हणून अश्विनी भिडे यांची नेमणूक झाली. आज तेथे भारतीय जनता पक्षाच्या महापौर, विरोधी पक्षाच्या नेत्या तसेच स्थायी समितीचे अध्यक्ष आदी अनेक स्थानावर महिला आहेत.

ही खरे तर अभिमानास्पद गोस्ट आहे. या साऱ्या महिला आता मुंबईचा कारभार वेगाने करतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्याचे ठरविले आहे. २०२९ च्या लोकसभेत याचे प्रतिबिंब उमटेल. सदस्य संख्याही वाढणार आहे आज महिला शिक्षण, आरोग्य, राजकारण,



अवकाश, रेलवे, व्यवस्था आदी क्षेत्रात वेगाने काम करीत आहेत. आता असे एकही क्षेत्र उरले नाही कि जेथे महिलांनी शिरकाव केलेला नाही. आज अभ्यासात महिला पुढे आहेत. शालेय परीक्षेत देशाच्या महिलाच बाजी म ारताना दिसून येतात. अभ्यासातही त्या पुढे आहेत. देशाच्या राष्ट्रपती पदी महिला आहे या सर्वांचा अभिमान आपणा सर्वाना आहे देशात असलेल्या कायद्यामुळे हे शक्य झाले आहे.

हे महिलांची जमेची बाजू आहे. तथापि महिलांच्या या कर्तत्वात पुरुषही पुढे पुढे करून काम करीत असल्याचे अनेक ठिकाणी दसून येते. आज कित्येक ग्रामपंचायत क्षेत्रात महिला सरपंच असली तरीही पुरुषाचं कारभार चालवितात असे चित्र दिसून येते. काही पंचायत समितीत व जिल्हा परिषदेत सुद्धा ही स्थिती आहे. अशा ठिकाणी पुरुषांनी भाग न घेता स्त्रियांना वाव देणे जरूर आहे असे केल्यास महिला वेगाने काम करू शकतील. या स्थितीत सुद्धा काही बदल होतील पण ते लवकर होणे जरुरीचे आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## श्री क्षेत्र येरमाळा नगरीत चुनखडी वेचण्यासाठी भक्तीचा सागर...



**येडेश्वरी माऊली माझी, कृपेचा सागर**
**चरणी ठेवितो मस्तक, दूर होवो दुःखभार**

**आईच्या नामात शक्ती, आईच्या नामात आधार**
**येडेश्वरीच्या कृपेने, होई जीवन साकार**

**आई राजा उदो उदो!!!**
**उदो उदो म्हणता माता, पावन होते हे जीवन**
**तुझ्या कृपेच्या छायेखाली, मिळे सुखाचा दरवळ**

श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा म्हणजे श्रद्धेचा, परंपरेचा आणि एकात्मतेचा उत्सव आहे. आजचा चुना वेचण्याचा सोहळा हा त्याचाच जिवंत प्रत्यय देणारा ठरला.

आई राजा उदो उदो च्या अखंड जयघोषात, फुलांच्या वर्षावात आणि भक्तीच्या दरवळात येरमाळा नगरी अक्षरशः दैवी वातावरणात न्हाऊन निघाली. प्रत्येक भाविकाच्या मनात या सोहळ्याने एक अविस्मरणीय छाप उमटवली

## प्रत्येक घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प : आ. किशोर जोरगेवार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, ही आजच्या काळाची अत्यंत मोठी गरज आहे. शहरांमध्ये वैद्यकीय सुविधा सहज उपलब्ध असतात; परंतु गावखेड्यातील अनेक कुटुंबांना अजूनही वेळेवर योग्य उपचार मिळत नाहीत. काही वेळा आर्थिक अडचणी, तर काही वेळा माहितीचा अभाव यामुळे रुग्ण उपचारापासून वंचित राहतात. त्यामुळे हे आरोग्य शिबिर आयोजित केले असून प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे ही आमची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आ. किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून तसेच भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर तालुका व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिर आज (५ एप्रिल २०२६) रोजी जिल्हा परिषद शाळा, धानोरा येथे उत्साहात पार पडले. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी जवळपास दीड हजार नागरिकांनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला. या कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला डॉ. अभिषेक जोशी, नानाजी शिंगणे, भारतीय जनता पक्षाचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, डॉ. पडगेलवार, नामदेव डाहुले, विजय आगरे, विनोद खेवले, संजय तिवारी, प्रदीप किरमे, तेजा सिंग, आशिष वाढई, ममता मोरे, रंगराव पवार आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी ते पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले. आजही अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे योग्य वेळी उपचार घेता येत नाहीत; त्यामुळे अशा शिबिरांच्या माध्यमातून त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. विशेषतः हायड्रोसिल, हर्निया, गर्भाशयाचे आजार, मोतीबिंदू यांसारख्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे गरजू रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे. आपण सर्वांनी आपल्या आरोग्याबाबत सजग राहणे अत्यंत गरजेचे आहे. वेळोवेळी तपासणी करून आजार लवकर ओळखल्यास त्यावर सहज उपचार करता येतात. त्यामुळे अशा शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय जनता पार्टी नेहमीच जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे. पुढील काळातही अशा लोकहितकारी उपक्रमांद्वारे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे हीच आपली खरी जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या शिबिरात मेडिसिन, न्यूरो, सर्जरी, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा अशा विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार केले. रुग्णांची नोंदणी, एक्स-रे, रक्त व लघवी तपासणी तसेच औषधोपचार मोफत करण्यात आले. काही गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले असून निवडक शस्त्रक्रियाही मोफत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## खापरखेडा येथे कुणबी समाजाचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न

- शेती सोबतच उद्योजकतेकडे वळा
- शिक्षण आणि मूल्यांची जोपासना काळाची गरज – तज्ज्ञांचे आवाहन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या प्रकाश नगर येथील कामगार मनोरंजन केंद्र २ येथे वीज कर्मचारी कुणबी समाज संघटनेच्या वतीने २९ मार्च रविवारला सर्व शाखीय कुणबी समाज स्नेह मिलन सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात समाजाची एकता शैक्षणिक प्रगती आणि भविष्यातील उद्योजकता या विषयांवर मान्यवरांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने व द्वीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता प्रदीप आखरे होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आशिष तायवाडे यांच्यासह पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपमुख्य अभियंता संजय तायडे, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता रवींद्र झलके व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या अधीक्षक अभियंता गीतांजली पारखी ह्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारुती भोज यांनी केले. यावेळी संजय तायडे यांनी कुणबी समाज हा मूळचा कृषिप्रधान आहे अशा स्नेह मिलन सोहळ्यांमुळे समाजात परस्पर सहकार्याची भावना वाढते एकीचे बळ आणि शिक्षणाचे महत्त्व ओळखून समाजाची प्रगती साधणे आवश्यक असल्याचे सांगितले तर अधीक्षक अभियंता गीतांजली पारखी यांनी आपली मुळे शेतीत असली तरी आताच्या काळात केवळ नोकरीवर अवलंबून न राहता व्यवसाय शिक्षणाकडे वळायला हवे करिअर गायडन्सच्या माध्यमातून आपल्या मुलांना उद्योजक बनवण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी प्रमुख वक्ते डॉ. आशिष तायवाडे यांनी मार्गदर्शन करतांना स्त्री सक्षमीकरण, नैतिक मूल्यांची जोपासना आणि व्यवसायाभिमुख करिअर या त्रिसूत्रीवर त्यांनी भाष्य करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

अध्यक्षीय भाषणात प्रदीप आखरे यांनी शेतीच्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधले ते म्हणाले जमिनीच्या तुकड्यांमुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. आपल्या मुलांनी आधुनिक शेती सोबतच शैक्षणिक आणि व्यावसायिक विकास साधणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

याप्रसंगी शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच यावर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला, शिवाय सर्व उपस्थित समाजबांधवांनी सहकुटुंब आपला परिचय दिला ज्यामुळे कार्यक्रमात घरगुती वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाचे संचालन अमर महल्ले यांनी केले तर आभार सारंग देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजेंद्र केमेकर, उमेश ढेपे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लोकसहभागातून हनुमान नगरचा कायापालट

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** एकता आणि दृढ इच्छाशक्ती असेल तर एखादा परिसर कसा बदलू शकतो याचे उत्तम उदाहरण चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या हनुमान नगर वॉर्ड क्र.३ च्या नागरिकांनी समोर ठेवले आहे. नागरिकांच्या लोकसहभागातून साकारलेल्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा व महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित स्वयं शक्ती फाउंडेशन स्थापनेचा समारंभ २ एप्रिलला हनुमान जयंतीच्या पावन पर्वावर मोठ्या उत्साहात पार पडला.

हनुमान नगरमधील नागरिकांनी एकत्र येत परिसरात अभूतपूर्व बदल घडवून आणले आहेत. या उपक्रम अंतर्गत संपूर्ण परिसरात पर्यावरणपूरक वृक्षारोपण, खांबांवर बसवलेली आकर्षक तिरंगा सिरीज आणि परिसराच्या सौंदर्यात भर घालणारा

'I Love Hanuman Nagar' हा सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे.

या सोहळ्याचे औचित्य साधून स्वयं शक्ती फाउंडेशन ची रितसर घोषणा करण्यात आली. महिलांना स्वावलंबी बनवणे त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांच्या शक्तीला योग्य व्यासपीठ मिळवून देणे हा फाउंडेशनचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. निलेश बारस्कर होते. प्रमुख पाहुणे म्हणून चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायतीच्या सरपंच मीनाक्षी तागडे, डॉ.मोनाली कावळे, पंकज गजभिये ग्रामपंचायत सदस्य सारिका धनविजय आदी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार सुवर्णा येवले यांनी केले.




कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैशाली बागवान, प्रिया रोहनकर, दिपाली निकुले, अश्विनी हरके, ममता भोयर, अर्चना कामटकर, कल्पना गिऱ्हे, सुजाता वाघ, सुवर्णा येवले, प्रतिभा वांढे, ओमप्रकाश हरके, हेमंत रोहनकर, क्रिष्णा गिऱ्हे, दादाराव बागवान, विष्णु निकोडे, रामेश्वर निकोडे, दीपक भोयर, साहील गिऱ्हे, हिमांशू वांडे, आशिष क्षिरसागर, नितिन इंगोले, दिनेश मिश्री, राजेश रोहनकर, सचिन सोनटक्के आदींनी केले कार्यक्रमाला हनुमान नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.अब्दुल सत्तार यांनी सोयगाव शिवारात नुकसानग्रस्त भागाची केली प्रत्यक्ष पाहणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, सोयगाव :** तालुक्यातील सोयगाव शिवारात अलीकडे झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी सोयगाव शिवारात नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.

या वेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. वादळीवारा व गारपिटीमुळे उभ्या पिकांचे तसेच फळबाग पाल्या भाज्यांचे नुकसान झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मका, बाजरी, ज्वारी यासारखे पिके आडवी पडली असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

पाहणी दरम्यान आमदार अब्दुल सत्तार यांनी तहसीलदार तसेच कृषी अधिकाऱ्यांना तात्काळ नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. शेतकऱ्यांचे नुकसान अचूक नोंदवून त्वरित शासनाकडे अहवाल सादर करावा, जेणेकरून मदत लवकर मिळू शकेल, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

तसेच, शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले. नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या संकटातून



सावरण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकरराव काळे, गोपीचंद जाधव, शहरप्रमुख संतोष बोडखे, उस्मान पठाण,गटनेते अक्षय काळे, युवानेते कुणाल राजपूत, तालुका कृषी अधिकारी कासार, विशाल चव्हाण, हर्षल काळे, कदीर शहा, श्रावण चव्हाण, किशोर मापारी, संदीप सुरडकर, दीपक पगारे, शेख रऊफ, फिरोज पठाण, मोतीराम पंडित, जितेंद्र चौधरी, रंगनाथ वराडे, समाधान काळे आदींची उपस्थिती होती.

## चिकन मार्केट परिसर ठरतोय ब्लॅक स्टॉप !

### अज्ञात बुलेट स्वाराच्या धडकेत दुचाकी चालक गंभीर जखमी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५ खापरखेडा (नागपूर) :** खापरखेडा राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या चिकन मार्केट समोर ४ एप्रिल शनिवारला दुपारी १ वाजताच्या सुमारास ऐका बुलेट स्वाराच्या धडकेत एक दुचाकी चालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली त्यामुळे परत एकदा चिकन मार्केट स्थलांतरित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

अशोक गजभिये रा. जयभोले नगर वार्ड क्रमांक १ असे गंभीर जखमी नाव आहे.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गा लगत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अनधिकृत चिकन विक्रेत्यांनी



आपली दुकाने थाटली आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ वाढल्याने येथे अनेक लहान मोठे अपघात घडले आहेत. शनिवारला दुपारी गजभिये आपल्या दुचाकीने मुख्य बाजारपेठे कडे येत होते. चिकन मार्केट समोर पाठीमागून येणाऱ्या एका बुलेट स्वार चालकाने गजभिये यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. सदर घटनेत गजभिये गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राष्ट्रीय महामार्ग परिसरात असलेले चिकन मार्केट अपघाताचे ब्लॅक स्पॉट झाले असून या परिसरात अनेक अपघात झाले आहेत. चिकन विक्रेत्यांना चिचोली आठवडी बाजारात जागा देण्यात आली आहे, शिवाय ओटे सुद्धा बांधून देण्यात आले आहेत. मात्र, स्थानिक ग्राम पंचायत प्रशासन चिकन विक्रेत्यांना अभय देत आहे.

चिकन मार्केट परिसरात अपघाताचा वाढता ग्राफ बघता राष्ट्रीय महामार्गावरून चिकन मार्केट हटविणे काळाची गरज आहे. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच चिचोली ग्राम पंचायत प्रशासनाने पुढाकार घेऊन चिकन मार्केट चिचोली आठवडी बाजारात स्थलांतरित करावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

# नाशिकच्या लाल मातीत पारनेरचा डंका !

## चेतन रेपाळे ‘तपोवन हनुमान केसरी २०२६’ चा मानकरी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** नाशिक येथील तपोवन परिसरात पार पडलेल्या राज्यस्तरीय ‘तपोवन हनुमान केसरी’ कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याचे सुपुत्र चेतन रेपाळे याने घवघवीत यश संपादन केले. अंतिम लढतीत कोल्हापूरच्या सुशांत तांबोळकरचा पराभव करत चेतनने ‘तपोवन हनुमान केसरी २०२६’ हा किताब आणि मानाची चांदीची गदा आपल्या नावावर केली. ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय कुस्ती नियमांनुसार विविध वजन गटांत पार पडली. महिला कुस्तीगीरांच्या लढती प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरल्या.

पुरुषांच्या खुल्या गटात राज्यातील तब्बल ३२ कसलेल्या मल्लांनी सहभाग नोंदवला होता. दिवसभर चाललेल्या अटीतटीच्या लढतींनंतर अंतिम फेरी पारनेरचा चेतन रेपाळे आणि कोल्हापूरचा सुशांत तांबोळकर यांच्यात रंगली. अंतिम लढतीत चेतनने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत सुशांतवर ५-२ अशा गुणांनी मात केली.

या विजयाबद्दल पै. चेतनला १ लाख १ हजार रुपये रोख आणि मानाची चांदीची गदा देऊन गौरविण्यात आले. गेल्या महिन्यात वाघोली येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत त्याने तिसऱ्या क्रमांकापर्यंत मजल मारली होती. त्याची गेल्या दोन वर्षांतील प्रगती पाहता, तो लवकरच ‘महाराष्ट्र केसरी’ आणि आंतरराष्ट्रीय पदक विजेता होईल, असा विश्वास कुस्ती क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

**● डबल महाराष्ट्र केसरी पै.हर्षवधन सदगिर यांचा सन्मान**

या स्पर्धेमध्ये डबल महाराष्ट्र केसरी पै.हर्षवर्धन सदगिर यांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन माजी खासदार हेमंत गोडसे, रोहन देशपांडे आणि उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. उत्तम दळवी यांनी केले होते. विजेत्यांचा सत्कार हेमंत गोडसे, विजय कळसकर, रविंद्र मोरे, सुर्यकांत लोटे मधुकर वाघ यांच्या हस्ते करण्यात आला.





पै.चेतनच्या या यशात वस्ताद नगरसेवक युवराज पठारे, कुंडलिक पठारे, बाळासाहेब पठारे, यशवंत पठारे, धनंजय खोसे, शंकर खोसे आणि कोच नितीन पवार व श्यामलाल भारद्वाज यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या विजयामुळे पारनेर तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

# कासा येथे पहिले आदिवासी साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५, कासा (पालघर) :** डहाणू मधील कासा येथे अनुजा अवकाश संस्था व आदिवासी साहित्य परिषद पालघर यांच्या वतीने पहिले आदिवासी संमलेन मोठया उत्साहात कासा ग्राम पंचायत बिरसा मुंडा सभागृहात रविवारी पार पाडले. या साहित्य समलेनासाठी पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार सह नाशिक जिह्यातील साहित्यिक, कवी यांनी सहभाग घेतला होता. या संमेलनाचे दोन सत्रात आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात आदिवासीचे मौखिक साहित्य असून त्याला लिखित स्वरुपात कसे आणतां येतील यांची चर्चा करण्यात आली, तर आदिवासी असणारे मौखिक साहित्य गौरीची गाणी, कांबड नाच, लग्न कार्यातील विधी, मरणानंतर चा विधी आदी हे साहित्य येणाऱ्या भावी पिढीला माहिती होण्यासाठी लिखित साहित्य गरज असल्याचे नमूद केले, तर आदिवासी जमाती मधील अनेक बोलीभाषा आहेत ह्या नामशेष होण्याच्या मार्गांवर आहेत याबाबत

पत्रकार नितीन बोंबाडे -यांनी डावर बोली भाषे बाबत महत्व सांगत येणाऱ्या काळा ही बोलीभाषा टिकवली पाहिजे असे मत व्यक्त केले.




डॉ.सखाराम डाखोरे- कवी, प्राध्यापक,यांनी अत्यंत ज्वलंत घडामोडी तसेच आदिवासी च्या जगणे, समस्या यावर कविता व मार्गदर्शन केले.

तर कवी किशोर डोके - आदिवासी भाषेचे मधील अनेक शब्द हे नष्ट होण्याच्या मार्गांवर असून आपली बोलीभाषा टिकवणे व संवर्धन करून त्यातून साहित्य निर्मिती होऊ शकते असे सांगितलं.

तर सुनिल झळके - आदिवासी समाजाचा इतिहास मांडला, यावेळी डहाणू चे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी कवी व साहित्यिक यांना आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार तसेच पालघर मधील वाढवण बंदर, रोजगार यांबाबत मार्गदर्शन करताना कवी, साहित्यिक यांनी हे भीषण वास्तव मांडले पाहजे असे नमूद केले, यावेळी अनुसूचित जाती, जमाती आयोगाच्या सदस्या वैदेही वाढाण यांनी ही आदिवासी समाजामध्ये नवीन साहित्यिक, कवी, पत्रकार, युट्युबर हे आदिवासी संस्कृती पुढे आणण्याचे काम करत आहेत. यावेळी माजी समाजकल्याण सभापती पांडुरंग बेलकर यांनी पहिले आदिवासी साहित्य व आदिवासी चा इतिहास यांना उजाळा देत या साहित्य समेलंना मधून नवीन साहित्यिक, नवोदित कवी यांना प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त केली, तर टीटीएफएस चेपालघर जिल्हाध्यक्ष विलास बेलकर यांनी आदिवासी वर प्रस्थापित समाजाच्या साहित्याचा प्रभाव होता. नवीन आदिवासी साहित्यिक, कवी यांच्या मुळे समाजाला नवी दिशा मिळू शकत असा विश्वास व्यक्त केला.

दुपार नंतरच्या सत्रात कवी समेलंनात २१ च्या वर कवी, कवियत्री यांनी कविता सादर केल्या, ह्या कविता आदिवासी वरील अन्याय, अत्याचार, आदिवासी संस्कृती, इतिहास तर काही ज्वलंत प्रश्न , समस्या यावर रोख ठोक पणे विद्रोही, तितक्याच प्रेरणादायी कविता सादर करत उपस्थितांची मने जिकंले यामध्ये कवी रवी बुधर, कवी डॉ. सखाराम डाखोरे,कवी - दिनेश भोईर, कवी किशोर डोके, तर काही असंख्य नवीन कवी, कवियत्री यांनी अतिशय सुदंर कविता सादर केल्या, तर या कार्यक्रमांचे अध्यक्ष आदिवासी साहित्यिक नाशिक जिल्ह्यातील देवचंद महाले यांनी भुसवले त्यांनी नवोदित साहित्यिक, कवी यांचे भरभरून कौतुक करताना आदिवासी समाजावर येत्या काळात येणारे विकासाचे नावाने संकट, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, आदिवासी चा संघर्ष याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी आदिवासी एकता परिषदेचे राष्ट्रीय सचिव डॉ. सुनिल पऱ्हाड यांनी आदिवासी समाजाचे खूप मोठे मौखिक ज्ञान असून नवीन साहित्यिक, कवी यांनी आदिवासी समाजाचा जाणकारांकडून नीट रीती, रिवाज, परंपरा, रूढी याचा अभ्यास करून साहित्य निर्मिती केली पाहिजे असे मत व्यक्त केले. हे साहित्य संमेलन अनुजा अवकाश केंद्राचे अध्यक्ष चंद्रकांत घाटाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर भोईर, कवी किशोर डोके यांनी केले.

# बाबासाहेबांच्या विचारांतून घराघरात लोकशाही येईल -ॲड. वर्षा देशपांडे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** समानता हवेतून येणार नाही, तर बाबासाहेबांचे विचार घराघरात आणावे लागतील, मग घराम ध्ये आपोआप लोकशाही येईल अशा शब्दात विचार मांडत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ॲड. वर्षा देशपांडे यांनी स्त्रियांना समान मतदानाचा हक्क देण्यासह ४२ हून अधिक कायदे बाबासाहेबांनी केले तो स्त्रीमुक्तीचा खरा इतिहास आहे असे मत व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून ऐरोली सेक्टर १५ येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकात ३ ते १३ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या ‘जागर २०२६’ व्याख्यानमालेचे शुभारंभाचे व्याख्यानपुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या ‘जागर २०२६’ व्याख्यानम ालेच्या शुभारंभप्रसंगी स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील, नगरसेविका ऐश्वर्या सोनावणे, बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विभागप्रमुख उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, लेट्स रिड फाऊंडेशनचे प्रमुख लेखक- उद्योजक प्रफुल्ल वानखेडे,




शिक्षण मंडळ माजी सदस्य श्री.अंकुश सोनावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

मुंबईला जाता-येताना लांबून हे भव्यतम स्मारक नजरेस पडत होते व इथे एकदा भेट द्यायचीच अशी इच्छा मनात होती आणि आज याठिकाणी व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आले हे माझ्यासाठी स्वप्नवत असल्याची भावना ॲड. वर्षा देशपांडे यांनी व्यक्त केली. स्मारक कसे असावे याचा वस्तुपाठ म्हणजे हे स्मारक असल्याचे मत मांडत सर्वत्र बंद होत चाललेली व्याख्यानाची परंपरा नवी मुंबईसारख्या आधुनिक शहरात जोपासली जात आहे याचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे असे त्या म्हणाल्या. स्त्री ला शक्तीचे रूप मानले जाते पण तिला स्वत:हून पुढाकार घेऊन समान मानले जात नाही हे दुर्दैवाचे असल्याचे सांगत देवी म्हणून पुजू नका, अथवा दासी म्हणून हिणवू नका, तिला माणूस म्हणून स्विकारा हे जास्त गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. शेतीचा शोध स्त्रीने लावला कारण आदीम काळात बीजांकुरे उमलविणारी भूमी तिला तिच्यासारखी वाटली. तिच्याकडेच सृजनाची शक्ती आहे त्यामुळे तिचे महत्व जाणले पाहिजे व नुसते जाणून उपयोग नाही तर ते प्रत्यक्ष व्यवहारात मानले पाहिजे व अंगिकारले पाहिजे हे त्यांनी आवर्जून सांगितले.

मालमत्तेला नवऱ्यासोबत बायकोचे नाव लागावे म्हणून केलेला संघर्ष, मुलगी नको म्हणून स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी द्यावा लागलेला लढा, दारूबंदीसाठी केलेला उठाव अशा विविध आंदोलनातील प्रसंग सांगत ॲड. वर्षा देशपांडे यांनी दारूबंदी केलेल्या सर्व गावातील सरपंच या महिला होत्या हे आवर्जून अधोरेखित केले.

परिवर्तनाच्या चळवळीचे आम्ही इंजिन आहोत हे सांगताना संसार हा रथ आहे असे बोलले जात असले तरी प्रत्यक्षात हँडल असलेले पुढचे चाक पुरूषाकडेच असते ही वस्तुस्थिती असल्याचे सांगत ही स्थिती बदलून सम ान पातळीवर असलेल्या रथाच्या दोन चाकांसारखा संसार असायला हवा असे ठाम मत त्यांनी मांडले.

आज महिला विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत आणि त्यांना नोकरी, व्यवसाय करून घरही उत्तम सांभाळायचे आहे, यामध्ये त्यांना मोठी कसरत करावी लागते. यामध्ये सुपर वूमन होण्यासाठी स्वत:चीच होणारी घुसमट आता स्त्रीने स्वत:च थांबवून आत्मपरीक्षण करावे असा सल्ला देत बाई खऱ्या अर्थाने लोकशाही जगते कारण तिला सर्वांना सहभागी करून घेणे जास्त जमते अशा शब्दात स्त्रियांचे सामर्थ्य सांगितले.

## थोडक्यात

### सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तालुका कार्यालय उपयोग जिल्हा अध्यक्ष सतिश मोरे

**अक्षराज : उमेश तबीब**



**दि.०५, दापोली (रत्नागिरी) :** महिला, विद्यार्थी, शेतकरी, जेष्ठ नागरीक शेवटच्या थरातील सम ाज घटकाचे प्रश्न सोडवण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे नवीन तालुका कार्यालयाचा उपयोग केला जाणार आहे असे प्रतिपादन जिल्हा अध्यक्ष सतिश मोरे यांनी मंडणगड येथे केले ४ एप्रिल २०२६ रोजी पार्टीचे मंडणगड शहरातील नुतन कार्यालयाचे उद्घाटन तालुक्यातील पार्टिचे कार्यकर्ते व मान्यवरांचे उपस्थितीत करण्यात आले या निमीत्ताने आयोजीत स्वागत समारंभात ते बोलत होते यावेळी ते पुढे म्हणाले पार्टीचे संघटनात्मक बांधणीची धोरणे व नियमानुसार लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रश्न सोडवणारा दत्ताराम महाडीक या नव्या दमाच्या कार्यकर्त्यांची तालुक्याचे अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली असून ग्रामिण भागातील जनतेचे प्रश्न सोडवत तालुक्यात पार्टीचा विस्तार करण्याचे धोरण आहे याकरिता तालुक्यातील जुन्या नव्या कार्यकर्त्यांना एकत्रीत संगम साधून पक्ष वाढीसाठी संघटीत प्रयत्न केले जातील नाराजांची नाराजी ही दूर केली जाईल व आगामी पंधरा दिवसात तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर केली जाईल.

या कार्यक्रमास कोकण पदवीधर मतदार संघाचे जिल्हा सह संयोजक अजय दळवी तालुका अध्यक्ष दत्ता महाडीक, सचिन थोरे, विश्वदास लोखंडे, वसंत सुतार, सुशिल दळवी, आकाश नाविलकर, शैलेश तपकिरे, यश महेता, रामदास भागडे, आनंद नारकर, वैभव नारकर,पृथ्वीराज चव्हाण, विलास भागडे, नागेश जगताप, अशोक गोविलकर, राजेश पारेख, सुशिल दळवी, महेंद्र मोरे, सुयश थोरे, संजय पवार, संदेश बर्जे, अविनाश सागवेकर, काजल लोखंडे, स्मिता थोरे, सुशिला पाटील, यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. या कार्यक्रमाचे औचीत्यसाधून कुंबळे येथील ग्रामस्थ रमेश दळवी, नौशाद कुटरेकर व सहकाऱ्यांनी तसेच पाली येथील ग्रामस्थ विजय दुर्गवले व सहकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

### कुंडलवाडी लघुउद्योग संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी डॉ. विठ्ठल कुडमूलवार यांची निवड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी :** कुंडलवाडी येथील सर्व लघुउद्योग व्यावसायिक बंधूंची नुकतेच एक बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते कुंडलवाडी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष डॉ. विठ्ठल कुडम ूलवार यांची बिनविरोध लघूउद्योग संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आले. तर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक सुरेश कोंडावार व सचिव पदी लघु व्यावसायिक संतोष करपे यांची निवड करण्यात आले आहे. या बैठकीच्या प्रसंगी डॉ. विठ्ठल कुडमुलवार सर्व लघुउद्योग व्यावसायिक बंधूंना म्हणाले कि, कुंडलवाडी येथील जे काही लघु उद्योजक आहेत. त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत अशी ग्वाही याप्रसंगी दिले. या संघर्ष समितीच्या निवडी मागचे कारण म्हणजे कुंडलवाडी येथील मुख्य बाजारपेठेत गेल्या काही वर्षांपूर्वी नगर परिषदेने खूप मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधले होते. या शॉपिंग कॉप्लेकसच्या मोकळ्या जागी सर्व लहान लहान लघु उद्योजकांचे दुकाने होती. तेव्हा नगरपालिकेने बांधकाम करतेवेळी या सर्व दुकानदारांना पर्यायी व्यवस्था करून देऊन नवीन कॉम्प्लेक्स चे बांधकाम करण्यात आले. यानंतर आता नगरपरिषद प्रशासनाला पर्यायी जागेवरून उठून बाजार मैदानात सीसी रोडचे बांधकाम करावयाचे आहे. त्यासाठी सर्व दुकानदारांना उठवण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती या लघु उद्योजकांना मिळाली. यासाठी आपल्यावर अन्याय होऊ नये व वेळप्रसंगी नगरपालिका प्रशासनाच्या विरोधी लढा देण्यासाठी या सर्व लघु उद्योजकांनी संघर्ष समिती स्थापन करून यासाठी डॉ.विठ्ठल कूडमूलवार यांची अध्यक्षपदी निवड केली. या संघर्ष समितीचे असे म्हणणे आहे की, नगरपालिका प्रशासनाने आमच्या दुकानाच्या बाजूला काही अंतरापासून नगरपालिकेने रस्त्याचे बांधकाम करावे. आम्हाला उठवून बांधकाम केल्यास आमची दुकाने कायमची बंद होतील आणि आमचे कायमचे उदरनिर्वाह ही बंद होईल. अशी भिती सर्व दुकानदारांना झाली आहे. जर नगरपालिकेने आमच्यावर अन्याय केल्यास आम्ही लढा देऊ अशीही चर्चा या बैठकीत झाले. या बैठकीस सर्व कुंडलवाडी शहरातील लघु व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंद्रूपच्या तायक्वांदो प्रशिक्षक शिवराज मुगळे यांना राज्यस्तरीय डायमंड पुरस्कार जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०५, सोलापूर :** मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील तायक्वांदो प्रशिक्षक शिवराज मुगळे यांना उत्कृष्ट प्रशिक्षक राज्यस्तरीय डायमंड २०२६ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा सन्मान English Medium Student Sports Association Baramati यांच्या वतीने १६ एप्रिल रोजी बारामती येथे प्रदान केला जाणार आहे.

शिवराज मुगळे यांनी तायक्वांदो या क्रीडा प्रकारात अनेक खेळाडू घडवून राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांम ध्ये यश संपादन केले असून, त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे मंद्रूप परिसरात आनंदाचे वातावरण असून क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व पालकांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. आगामी काळातही ते अधिकाधिक खेळाडू घडवून क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.